शुद्धीपत्रक :
रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाच्या आणि त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांचे नामकरण करण्याबाबत. तसेच संचालनालयाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयातील विविध संवर्गाच्या पदनामात बदल करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन शुद्धीपत्रक क्रमांक कौविअ-२०१५/प्र.क्र.८८/प्रशा-२
मुख्य इमारत, २ रा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०५ फेब्रुवारी, २०१६

वाचा : १. शासन निर्णय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.६२/प्रशा-२, दिनांक १०.०४.२०१५
२. शासन निर्णय समक्रमांक, दिनांक ०१.०७.२०१५

शुद्धीपत्रक :

या विभागाचे संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक १०.०४.२०१५ च्या शासन निर्णयान्वये रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाच्या अधिनस्त कार्यालयांसाठी आहरण व संवितरण अधिकारी व नियंत्रण अधिकारी घोषित करण्यात आले आहेत. त्यानंतर संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक ०१.०७.२०१५ च्या शासन निर्णयान्वये रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाच्या आणि त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांचे नामकरण करण्यात येऊन, संचालनालयाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयातील विविध संवर्गाच्या पदनामांत बदल करण्यात आले आहेत.

२. या विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक ०१.०७.२०१५ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद २ च्या कोष्टकात अनुक्रमांक १ च्या समोरील “कार्यालयाचे प्रस्तावित नाव” या स्तंभामध्ये “मुंबई” ऐवजी “कोकण भवन, नवी मुंबई” असे वाचण्यात यावे.

४. सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०२०५१५२१४६२१०३ असा आहे. हे शुद्धीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

Devappa Annappa Gawade
Digitally signed by Devappa Annappa Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400001, st=Maharashtra, cn=Devappa Annappa Gawade
Date: 2016.02.05 15:21:05 +05'30'

(दे.आ. गावडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
२) राज्यपाल यांचे सचिव
३) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४) मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

५) मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
६) प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, यांचे स्वीय सहायक
७) सर्व मंत्रालयीन विभाग
८) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९) सामान्य प्रशासन विभाग/कार्या. १८ (र. व का.)/१२/९/९-अ/१०-अ
१०) आयुक्त, कौशलय विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई आणि संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये
११) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१२) सर्व कोषागार अधिकारी
१३) निवड नस्ती